# तहसिलदार,बुलडाणा यांचे कार्यालय

रा.प्र.क्र.एम.आर.सी.८१/सुंदरखेड/ १७ /२०१९-२०२०
अर्जदार :- श्री.शैलेंद्रसिंह बैजनाथसिंह ठाकुर व इतर
रा.शिवशंकर नगर,सुदंरखेड.ता.जि.बुलडाणा

## आदेश

**(पारित दिनांक :-20 /०२/२०२०)**

अर्जदार श्री.शैलेंद्रसिंह बैजनाथसिंह ठाकुर व सौ.मोहिनी शैलेंद्रसिंह ठाकुर रा.शिवशंकर नगर,सुंदरखेड ता.जि.बुलडाणा यांनी रा.मा.क्र.एन.ए.पी.३४/सुंदरखेड(सुकाळखेड)/०४/१९८३-८४ आदेश दिनांक-०७.०६.१९८४ अन्वये जमिन निवासी प्रयोजनार्थ अकृषक मंजुर करण्यात आलेल्या मौजे सुंदरखेड येथिल शेत गट नं.७३/७५ मधील भुखंड क्र.०१ क्षेत्र ४९२.चौ.मी. मधील जागेवर बांधकाम करण्याची परवानगी मिळणेबाबत दि.०३/१०/२०१९ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले अर्जासह अर्जदाराने ७/१२ व अकृषक आदेश मंजुर अभिन्यास व बांधकाम मंजूर अभिन्यासाच्या प्रती इ.दस्ताऐवज दाखल केला.

अर्जदाराने दाखल केलेल्या दस्ताऐवज पत्र क्र.कावि/प्रस्तुतकार-१/८७३/२०१९ दि. ०२/११/२०१९ अन्वये मंजुरीकरीता/अभिप्रायकरीता सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग बुलडाणा यांच्याकडे पाठविण्यात आला.

सहायक संचालक नगर रचना विभाग बुलडाणा यांचे पत्र.जा.क्र.बां.प/मौ.सुंदरखेड/स.नं.२४/गट नं.७३ व ७५/भु.क्र.०१/ससंनरबु/१२२ दिनांक-२८/०१/२०२० अन्वये पत्रातील अटी व शर्तीनुसार शिफारसीसह निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ अधिकृत बांधकाम परवानगी मंजुर अभिन्यासाच्या प्रमाणीत प्रती प्रकरणात सादर केल्या आहेत.

सहायक संचालक नगर रचना विभाग बुलडाणा यांनी बांधकाम परवानगी खालील नकाशाची छाननी केली असून सदर बांधकाम नकाशांना लाल रंगाने दर्शवलेल्या दुरुस्तीनुसार खालील अटी व शर्तीस अधिन राहून निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ अधिकृत बांधकाम परवानगी मंजूर करण्याची शिफारस दिलेली असून प्रकरणामध्ये दि.२०.०१.२०२० रोजी विकास शुल्क रु.१,०२,०००/- व अधिमुल्य रु.३,७८,०००/- चा भरणा अर्जदाराने केलेला आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८(१) अन्वये सदर प्रकरणी आदेश पारीत करण्यास तहसिलदार हे सक्षम असल्यामुळे, मी तहसिलदार,बुलडाणा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८(१) अन्वये अर्जदार श्री.शैलेंद्रसिह बैजनाथसिंह ठाकुर व इतर १ यांना खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून, मा.उपविभागीय अधिकारी,बुलडाणा यांचे फाईलवरील रा.मा.क्र.ए-न.ए.पी.३४/सुंदरखेड(सुकाळखेड)/०४/१९८३-८४ आदेश दिनांक-०७.०६.१९८४ अन्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक झालेल्या मौजे सुंदरखेड येथील गट नं.७३ व ७५ मधील प्लॉट क्र.०१ क्षेत्र ४९२.०० चौ.मी वर वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम परवाणगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती पुढील प्रमाणे:-

१) आवेदकाने करुन दिलेले बंधपत्र त्यांना बंधनकारक राहील.
२) प्रादेशिक योजना बुलडाणा करीता लागू असलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुर्दीचे पालन करणे बंधनकारक राहील. इमारतीचा वापर फक्त निवासी प्रयोजनासाठीच करण्यात यावा.
३) मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक राहील.
४) बांधकाम परवानगी मिळाल्यापासून एक वर्षाचे आत अर्जदारास बांधकाम पूर्ण करावे लागेल.
५) सार्वजनिक नाली पर्यंत सांडपाणी सोडण्याची व्यवस्था अर्जदारास करणे आवश्यक आहे.
६) स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
७) लगतच्या भूखंडधारकांचा सुविधाधिकार बाधित होणार नाही याची अर्जदाराने दक्षता घेणे आवश्यक राहील.
८) भूखंडाच्या हद्दीमध्ये व मालकी हक्कासंबंधी काही वाद अगर कायदेशिर अडचण असल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाकडे राहणार नाही.
९) या कार्यालयाचा अभिप्राय नियोजनाच्या दृष्टीने असून मालकी, हक्काचे रितसर दस्ताऐवजाबाबत आपले स्तरावर शहानिशा करावी.

३

१०) बांधकाम साहित्यात प्लायॲश विटा व प्लायॲश आधारित साहित्याचा वापर करण्यासाठी केंद्र शासनाच्या नियमाची अंमलबजावणी करणे आवश्यक राहिल.

११) रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम बसविणे आवश्यक राहील.

१२) शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या निर्देशाप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१३) शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दि.१७.०६.२०१० नुसार बांधकामाच्या एकूण मुल्यावर(जमीनीची किंमत वगळून) १ % एवढा इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर वसुल करणे अर्जदारास भरणे बंधनकारक आहे.

१४)मंजुर नकाशाप्रमाणेच बांधकाम करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/ भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर राहील अथवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अनाधिकृत बांधकामावर रितसर कार्यवाही सक्षम प्राधिकरणाकडुन प्रस्तावित करण्यात येईल.

१५) प्रस्तावासोबत उपलब्ध कागदपत्राच्या आधारे मंजुरीची शिफारस केली आहे सदर कागदपत्रे बोगस वा दिशाभुल करणारे आढळल्यास त्याच प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम केले असल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी.

१६) शासनाचे विविध स्वरुपातील कामगार कल्याण उपकरासह आयकर महसुल विभागाकडे भरणा करणे अर्जदार/ जमिन मालक यांना बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्तीनुसारच आवेदकास निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकामाची परवानगी देण्यात येत आहे.

( संतोष शिंदे )
तहसिलदार बुलडाणा

प्रतिलिपी:-

१) मा.उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांना माहीतीस सविनय सादर.

२) नगर रचनाकार,बुलडाणा यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

३) सचिव /सरपंच ग्रामपंचायत, सुंदरखेड यांना माहीतीस व कार्यवाहीस रवाना.

४) तलाठी, मौजा सुंदरखेड ता.जि.बुलडाणा यांना माहीतीस रवाना.

५) श्री.शैलेंद्रसिंह बैजनाथसिंह ठाकुर व इतर १ रा.सुंदरखेड ता.जि.बुलडाणा यांना माहीतीस व पुढील कार्यवाहीस रवाना.

20/2/20

तहसिलदार बुलडाणा

तहसिलदार यांचे कार्यालय
बुलडाणा